**MHAH220009802022**

नियमित दिवाणी दावा क्र. २३९/२०२२
शिवाजी वि. मच्छिंद्र वगैरे

## आदेश
**(नि.क्र.३७ खाली)**

वादीतर्फे मोजणीसाठी कोर्ट कमीशनर नेमणुकीचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्ज कलम १अ मध्ये नमुद केलेली मौजे निंबोडी येथील बागायत शेतजमिन गट क्र. ३३/१/४ चे क्षेत्र ० हे. ८५ आर पुर्वेस ३४, दक्षिणेस ३३/१/५, पश्चिमेस शिव, उत्तरेस ३३/१/३, अर्ज कलम १अ मध्ये नमुद केलेली मौजे निंबोडी येथील बागायत शेतजमिन गट क्र. ३३/१/१ चे क्षेत्र ० हे. ८४ आर च्या पुर्वेस ३६, दक्षिणेस ३३/१/२, पश्चिमेस शिव व उत्तरेस रस्ता, गट क्र. ३३/१/२ चे क्षेत्र ० हे. ८४ आर च्या पुर्वेस ३६, दक्षिणेस, ३३/१/३, पश्चिमेस शिव व उत्तरेस ३३/१/१, गट क्र. ३३/१/३ चे क्षेत्र ० हे. ८४ आर च्या पुर्वेस ३६, दक्षिणेस ३३/१/४, पश्चिमेस शिव व उत्तरेस ३३/१/२, गट क्र. ३३/१/५ चे क्षेत्र ० हे. ८८ आर च्या पुर्वेस ३४, दक्षिणेस ३३ पैकी, उत्तरेस शिव व पश्चिमेस ३३/१/४ व अर्ज कलम १अ मध्ये नमुद केलेली मौजे निंबोडी येथील बागायत शेतजमिन गट क्र. ३३ चे क्षेत्र ४ हे. ३३ आर, पुर्वेस ३२, ३४, दक्षिणेस शिव, पश्चिमेस शिव, उत्तरेस ३३/१/५ अशाप्रकारे दावा मिळकतीचे वर्णन आहे. अर्ज कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचा मुळ गट क्र. ३३ असा असून त्याचे क्षेत्र ८ हे. ४६ आर असे होते. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वादीचे सख्खे भाऊ आहेत. प्रतिवादी क्र. १५ व १६ वादीची मुले आहेत. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे मुळ गट क्र. ३३ क्षेत्र ८ हे. ४६ आर पैकी निम्मे क्षेत्र उत्तरेकडील आहे व निम्मे क्षेत्र वादीचे चुलत पुतणे प्रकाश माणिक गरड व बाळु माणिक गरड यांचे निम्मे ४ हे. २३ आर क्षेत्र अर्ज कलम १क मधील मिळकत होती.

३. वादीने पुढे असे कथन केले आहे की, गट क्र. ३३ पैकी उत्तरेकडील ४ हे. २३ आर क्षेत्र वादी व त्यांचे भाऊ यांचे वडीलोपार्जित आहे. वादी व त्यांचे भाऊ यांचे दरम्यान सन २००१ मध्ये आपआपसात संमतीने वाटप झाले व दावा कलम १ब मधील मिळकत गट क्र. ३३/१/१ क्षेत्र ० हे. ८४ आर प्रतिवादी क्र. ३

यांना, गट क्र. ३३/१/२ क्षेत्र ० हे. ८४ आर ही प्रतिवादी क्र. २ गोरख यांना, गट क्र. ३३/१/३ क्षेत्र ० हे. ८४ आर ही प्रतिवादी क्र. १ यांना, दावा कलम १अ गट क्र. ३३/१/४ क्षेत्र ० हे. ८५ आर ही जमिन वादी यांना आणि गट क्र. ३३/१/५ क्षेत्र ० हे. ८६ आर ही भुजंग रंगनाथ गरड यांना वाटपात देण्यात आली त्याप्रमाणे तहसिलदार कर्जत यांचेकडील वाटप आदेश क्र. एसआर/३७२/२००० नुसार रेकॉर्डला वादी व त्यांचे भाऊ यांची फेर क्र. ३१९९ ने नोंद झालेली आहे. गट क्र. ३३/१/५ क्षेत्र ० हे. ८६ आर जमिन प्रतिवादी क्र. २ भुजंग यांना रंगनाथ गरड यांनी खरेदीखताने विकत दिली त्याप्रमाणे रेकॉर्डला प्रतिवादी क्र. २ ची नोंद आहे. अशाप्रकारे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे दरम्यान आपआपसात संमतीने वाटप झाले आहे व ते मशागत करुन उत्पन्न घेत आहेत.

४. वादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा कलम १क मधील गट क्र. ३३ पैकी ४ हे. २३ आर क्षेत्र हे दक्षिणेकडील असून ते बाळू माणिक गरड व प्रकाश माणिक गरड यांचे होते. त्यानंतर वेगवेगळया खरेदीखताप्रमाणे गट क्र. ३३ पैकी या जमिनीचे ७/१२ उताऱ्यास त्यांच्या नोंदी झालेल्या आहेत. वादी यांचे नावे गट क्र. ३३/१/४ ही जमिन आहे. वादीचे उत्तरेस प्रतिवादी क्र. १ यांची गट क्र. ३३/१/३ ही जमिन आहे आणि दक्षिणेस गट क्र. ३३/१/५ ही प्रतिवादी क्र. २ यांचे नावे जमिन आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे जमिनी दरम्यान पुर्व-पश्चिम बांध आहे. सदर बांध जमिनीची नांगरट करताना फोडला. त्यावेळी वादी याने प्रतिवादी क्र. १ व २ यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी जमिन मोजुन घेण्यास सांगितले. त्यानंतर वादी यांनी मोजणीकामी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे मोजणीकामी अर्ज केला असता सहहिस्सेदार यांच्या संमतीशिवाय मोजणी करता येणार नाही असे सांगितले. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते १६ यांना मोजणीकामी संमती मागितली असता संमती दिली नाही. उलट प्रतिवादी क्र. १ व २ हे बांध फोडून अतिक्रमण व हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान असलेला बांध मोजणी होऊन निश्चीत होणे आवश्यक आहे. त्यामुळे दावा कलम १अ, १ब व १क मध्ये वर्णन केलेल्या जमिनीची मोजणी करुन दावा कलम १अ गट क्र. ३३/१/४ च्या हद्दीखुणा निश्चीत करुन अहवाल मे. कोर्टात दाखल होणेकामी कोर्ट कमिशनर म्हणून उपअधिक्षक तालुका भूमी अभिलेख कर्जत यांची नेमणुक करणेकामी वादीने विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन अर्जात नमुद केलेल्या सर्व जमिनी वादीकडून खर्च घेऊन मोजणी करणेस हरकत नसल्याचे कथन केले आहे.

६. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. माझे समोर खालील प्रश्न चर्चेसाठी उपस्थित झालेले आहेत. त्यावरील कारणमिंमासेसह मी माझे निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | अर्जात नमुद केल्याप्रमाणे उपअधिक्षक भुमी अभिलेख, कर्जत यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करणे आवश्यक आहे काय ? | ...होय. |
| २. | काय आदेश ? | … अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

७. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी सर्व्हे क्र. ३३ व सर्व्हे क्र. ३३ मधील पडलेल्या सर्व गटाची व पोटहिश्याची मोजणी करण्यास तयार असल्याचे त्यांनी त्यांच्या युक्तीवादादरम्यान मान्य केले आहे. वादीने त्यांच्या युक्तीवादादरम्यान असाही युक्तीवाद केला आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे बांध फोडून वादीच्या क्षेत्रात अतिक्रमण व हरकत अडथळा करीत आहेत. वादी व प्रतिवादी या दोघांची वादमिळकत मोजुन घेण्याची मागणी आहे. तसेच वादी व प्रतिवादी या दोघांचे म्हणणे आहे की, त्यांच्या मिळकतीत अतिक्रमण होत आहे. त्यामुळे मुळ सर्व्हे क्र. ३३ व अर्जात नमुद केलले गट नंबर व त्यांच्या पोटहिश्यांची मोजणी करुन त्याचा अहवाल मागविणे योग्य होईल. ज्यामुळे दाव्याचा गुणवत्तेवर अंतिम निकाल होण्यास मदत होणार आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२. दावा मिळकत मौजे निंबोडी ता.कर्जत येथील दावा मिळकत गट नं. ३३/१/१, ३३/१/२, ३३/१/३, ३३/१/४, ३३/१/५ व गट क्र. ३३ च्या क्षेत्राची पोटहिश्यासह आणि मुळ सदर गटाचा मुळ सर्व्हे नंबर याची मोजणी होणेकरिता उपअधिक्षक भुमी अभिलेख, ता. कर्जत यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येते.

३. वादी व प्रतिवादी यांनी मोजणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे उपअधिक्षक भुमी अभिलेख, कर्जत यांना सादर करावीत. त्यानंतर उपअधिक्षक भुमी अभिलेख, कर्जत यांनी नियमानुसार मोजणी करुन हद्यीखुणा दाखवून तसा अहवाल न्यायालयात सादर करावा.

४. वादी यांनी मोजणीची रक्कम भरल्यानंतर मोजणी करावी.

५. वादी यांनी मोजणीची रक्कम जमा न केल्यास अर्ज खारीज झाला असे समजण्यात येईल.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.09.23 11:34:10 +0530

(आर. बी. राऊत)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :२३/०९/२०२५.